# महात्मा गांधी

(दि.२ ऑक्टोबर, १८६९ - ३० जानेवारी, १९४८)

(अल्प परिचय)

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म गुजरातमधील पोरबंदर येथे एका सुसंस्कृत व प्रतिष्ठित कुटुंबात झाला. सन १८८५ मध्ये त्यांच्या वडीलांचे निधन झाले. गांधीजींना बॅरिस्टर होण्याकरिता इंग्लंडला पाठवावे असे त्यांच्या वडीलबंधूंनी ठरविले. सन १८८८ मध्ये ते इंग्लंडला गेले. तेथे सन १८९१ मध्ये बॅरिस्टर झाले. तत्पूर्वी लंडनची मॅट्रिक परीक्षाही ते उत्तीर्ण झालेच होते. पोरबंदराच्या व्यापाऱ्याने एका वर्षाच्या कराराने सन १८९३ मध्ये त्यांना दक्षिण आफ्रिकेत नेले. तेथे सुमारे २० वर्षे राहून त्यांनी वकिलीचा अनुभव घेतला.

हिंदी मजुरांवर तेथे राहण्याबद्दल जादा कर देण्याचे विधेयक विधिमंडळापुढे मान्य झाले होते. याविरुद्ध गांधीजींनी सत्याग्रहाची चळवळ उभारली. या सत्याग्रहाचे पडसाद आफ्रिकेप्रमाणेच इंग्लंड व हिंदुस्थान येथेही उमटले. सन १९१२ साली गोपाळकृष्ण गोखले हे काळा कायदा रद्द करावा म्हणून आफ्रिकेत गेले. तेव्हापासून गांधी व गोखले यांचा स्नेह जमला. गोखले यांस गांधीजींनी आपले राजकीय गुरू मानले.

गांधीजींनी सन १९१७ मध्ये शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी बिहारमधील चंपारण्यास भेट दिली. चंपारण्य सत्याग्रहामुळे गांधींजींचे भारतीय नेतृत्त्व चमकू लागले.

गांधीजींनी १९३० साली सविनय कायदेभंगाची घोषणा केली. दि. १२ मार्च, १९३० रोजी साबरमती आश्रमातून गांधींनी “स्वराज्य मिळाल्याशिवाय परत येणार नाही” अशी प्रतिज्ञा करून समुद्र किनाऱ्यावरील दांडीकडे मिठाचा कायदा तोडण्याकरिता ७२ सत्याग्रही वीरांसह यात्रा सुरू केली. देशभर मिठाचा कायदा मोडणारे सत्याग्रह आंदोलन उभे राहिले. दि. ४ मे, १९३० रोजी गांधीजींना कराडी या गावी अटक झाली, येरवड्याच्या तुरुंगात सरकारने त्यांची रवानगी केली. देशामध्ये लक्षावधी लोक कायदेभंग करून कारावासाची शिक्षा भोगू लागले. गांधीजी आणि आयर्विन यांच्यात वाटाघाटी सुरू होऊन दि. ५ मार्च, १९३१ रोजी *गांधी - आयर्विन* करार झाला.

गांधीजींनी दि. ८ ऑगस्ट, १९४२ रोजी अखिल भारतीय काँग्रेस समितीची मुंबई येथे बैठक बोलाविली. त्या बैठकीत त्यांनी “छोडो भारत” आंदोलन देशभर सुरू केले. गांधीजींनी लोकांना “करा किंवा मरा”चा नारा दिला. सन १९४६ मध्ये इंग्लंडमध्ये मजूर पक्षाचे मंत्रिमंडळ ॲटली यांच्या नेतृत्वाखाली सत्तारूढ झाले. त्यांनी मे, १९४६ मध्ये

भारताच्या स्वराज्याची योजना तयार केली. संविधान परिषद व हंगामी राष्ट्रीय मंत्रिमंडळ बनविण्याचा अधिकार भारताला त्या योजनेप्रमाणे मिळाला.

दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताचे स्वातंत्र्य जाहीर झाले. हिंदु-मुसलमानांच्या भयंकर कत्तली चालूच होत्या. गांधीजींनी दिल्लीतील वातावरण शांत होईपर्यंत उपोषण करण्याचे जाहीर केले. दि. १३ जानेवारी, १९४८ रोजी बेमुदत उपोषण सुरू केले. भारत सरकारने पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यावे अशी गांधीजींची मागणी होती. ही मागणी वल्लभभाई प्रभृती नेत्यांना मान्य नव्हती. परंतु गांधीजींचा जीव वाचविण्याकरिता ती अखेर मान्य करावी लागली. १६ जानेवारी रोजी गांधीजींनी उपोषण सोडले.

“राष्ट्रपिता” म्हणून सर्वश्रेष्ठ अद्वितीय बहुमान गांधीजींना प्राप्त झाला.

******

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ )